# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

ई-मेल : fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ : www.mahafra.org
संपर्क : ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

क्रमांकः शुनिप्रा/सूचना/ ४३ /२०२६ दिनांक : ०८/०१/२०२६

वाचा : १) दि. २०/०६/२०२५ रोजीची सूचना
२) दि. २५/०७/२०२५ रोजीची सूचना
३) दि. २६/०९/२०२५ रोजीची सूचना
४) दि. ०१/१२/२०२५ रोजीची सूचना
५) दि. ०१/०१/२०२६ रोजीची सूचना


## संबंधित संस्था महत्वाची अंतिम सूचना

उक्त नमूद सूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण /कृषी या विभागांतर्गत येणाऱ्या व प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४(४) नूसार संस्थेच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावर **"FRA- Fee Structure"** प्रसिध्द करावे असे सूचित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालयांनी प्राधिकरणाकडून निश्चिंत केलेले शुल्क तसेच विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत काढण्यात येणारा धनाकर्ष कोणाच्या नावाने काढण्यात यावा याबाबत नमूद नसल्याने प्रवेशाकरिता विद्यार्थी/पालक यांना अडचणी येत असल्याच्या तक्रारी प्राधिकरणाकडे येत आहेत. त्यानुसार खाली नमूद प्रमाणे आपल्या संस्थेचे शुल्क व धनाकर्ष याबाबतची स्पष्ट माहिती संस्थेच्या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावर स्वतंत्र टॅब देवून प्रसिध्द करण्यात यावी.

| Sr. No. | Description | Fees | Total Fees A.Y. 2025-26 |
|---|---|---|---|
| 1 | Tuition fee | | |
| 2 | Development Fee | | |
| 3 | Management Seat Fees | | |
| 4 | NRI Seat Fees | | |
| 5 | Against NRI Seat Fees | | |
| 6 | Caution Money / Deposite (1 Time) | | |

**धनाकर्ष (Demand Draft) कोणाच्या नावाने काढण्यात यावा याबाबतचा स्पष्ट उल्लेख**



त्या अनुषंगाने अद्यापपर्यंत काही संस्थांनी कारवाई केलेली दिसून येत नसल्याने सर्व संबंधित संस्थांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की त्यांनी वरील सूचनेप्रमाणे संकेतस्थळावर दि. १८/०१/२०२६ पर्यंत वरीलप्रमाणे शुल्क प्रदर्शित करण्यात यावे. त्यानंतर प्राधिकरणाकडून तपासणी करताना शुल्क संकेतस्थळावर वरील मुदतीत प्रदर्शीत न केल्याचे आढळल्यास कोणतीही सूचना न देता कायद्याच्या कलम २० नुसार कारवाई करण्यात येईल. सदर कारवाईबाबत आलेल्या कोणतेही विनंतीवजा म्हणणे मान्य करता येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई